# NUTA BULLETIN

FORTNIGHTLY JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHER'S ASSOCIATION

Regd. No. ATI 263 *Licensed to post without prepayment No. ATI 10

YEAR : 24 ) 1st October, 1999 ( NO : 9

# INDEFINITE STRIKE FROM 8TH DECEMBER 1999.

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATION**
University Club House, B Road, Churchgate, Bombay-400 020.

**Prof. C.R.Sadasivan : Prof. Sambhaji Jadhaw**
President Gen. Secretary
**Dated : 27th September, 1999**

Shri. Narayan Rane,
Hon'ble Chief Minister
Maharashtra State, Mantralaya, Mumbai-400 032.

Dear Hon'ble Chief Minister :

You might be aware that in connection with the implementation of the central orders on the revision of pay-scales of University & Degree College teachers in Maharashtra, the MFUCTO has been in correspondence with Shri. Manohar Joshi, when he was the Chief Minister as also with Shri. Datta Rane, the Hon'ble Minister for Higher and Technical Education right from August 1998.

Thereafter, on your taking over as the Chief Minister of our State, the MFUCTO has sent letters to you also in the same connection. We also had a short meeting with you in the presence of Prof. N.S. Pharande, Hon'ble Chairman of the Legislative Council. The MFUCTO had also sent to you notice about the intention of the University and college teachers in the State to proceed on an indefinite strike starting from 21st July 1999.

However, in view of the election notification for the Lok Sabha to begin with and thereafter for the Maharashtra State Legislative Assembly, the MFUCTO executive Committee decided not to proceed with the said strike but to hold the same in abeyance till the code of conduct stood withdrawn. It was hoped that the government orders in the meanwhile would be issued, and in any case, as soon as the code of conduct was withdrawn, till today the government orders in that respect are not released and the injustice and humiliation of the university & degree college teachers continues unredressed inasmuch as though a class IV employee is appointed on a basic pay of Rs. 2550, an university and/or college Lecturer even today is appointed on a basic pay of Rs. 2200.

The Executive Committee and the General Council of the MFUCTO which met on Sunday, 26th Sept. 1999 in Mumbai to discuss the situation, unanimously resolved to recommence its suspended movement. A Copy of the **Resolution of the MFUCTO (in Marathi) is enclosed.** Accordingly, the **MFUCTO will be staging a one-day Demonstration all over the State on Wednesday, 20th October 1999** of University and degree college teachers to be followed by the **indefinite strike commencing from Wednesday, 8th December 1999.**

This communication is being sent to you as an intimation of the MFUCTO struggle.

Yours faithfully
s/d C.R.Sadasivan s/d Sambhaji Jadhaw
President **MFUCTO** Gen.Secretary

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATION**
University Club House, B Road, Churchgate, Bombay-400 020.
**Press release : Mumbai, 27th Sept. 1999 : for favour of publication**

**MORCHA ON 20TH OCTOBER 1999 : INDEFINITE STRIKE FROM 8TH DECEMBER 1999**

The Executive Committee of the MFUCTO which met in Mumbai on Sunday, 26th Sept. 1999 discussed the situation arising out of Maharashtra Government's failure to implement the central order on the revision of pay scales in respect of the university and college teachers. Though 11 months have passed since 6th Nov. 1998 when the final central order was issued the state government has done precious little in implementing the said order. The MFUCTO which had earlier given a call for an INDEFINITE STRIKE to commence from 21st july 1999 had to hold the said INDEFINITE STRIKE in abeyance in view of the notification for elections to the Lok Sabha and the State Assembly. In view of the government's failure to act in the matter even after the code of conduct has been withdrawn, the MFUCTO Executive Committee unanimously resolved to Stage Demonstrations all over Maharashtra on 20th October 1999 and to proceed with an Indefinite strike commencing from wednesday, 8th December 1999. The said Resolution was also unanimously endorsed by the General Council of the MFUCTO held later in the day, attended by delegates from all the affiliated units in the non-agricultural universities in the State.

**C.R.Sadasivan** **Sambhaji Jadhaw,**
President **MFUCTO** Gen.Secretary

# DEMONSTRATIONS ALL OVER THE STATE ON 20TH OCTOBER 1999

# महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने, रविवार, दिनांक २६.९.१९९९ रोजी सम्मत केलेला पुढील प्रस्ताव त्याच दिवशी झालेल्या जनरल कौन्सिलच्या बैठकीत मंजूर करण्यात आला

१ जानेवारी १९९६ पूर्वी मंत्रालयातील जे सचिव रुपये ७३००-७६०० च्या वेतनश्रेणीत कार्यरत होते. त्यांना २२४००-२२४५० ही वेतनश्रेणी ३०.९.९७ च्या शासननिर्णयाने १ जानेवारी १९९६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात आली आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून ते नवीन वेतनश्रेणीनुसार वेतन घेत आहेत.

राज्यातील इतर अधिकारी व कर्मचारी यांच्याबाबत पाचवा वेतन आयोग लागू करतांना शासनाने अक्षम्य दिरंगाई केली. **कार्यालयातून बाहेर पडून सर्व कर्मचारी मंत्रालयाच्या व्हरांड्यात ठिय्या मांडून बसले. एक दिवस मंत्रालयातील काम बंद पडले.** मा. मुख्यमंत्र्यांना कार्यालयात जाता आले नाही. घरी बसूनच "फायली" काढाव्या लागल्या. राज्यभर कर्मचाऱ्यांनी असंतोष व्यक्त केला, त्यानंतर कुठे १० डिसेंबर १९९८ चा शासननिर्णय निघाला. शासकीय सेवेतील सर्वात कनिष्ठ शिपाई या पदावर ७२०-९४० या वेतनश्रेणीमध्ये काम करणाऱ्या सेवकाला २५००-३२०० ही वेतनश्रेणी १ जानेवारी १९९६ पासून लागू झाली.

माध्यमिक शिक्षकांच्या बाबतीत कोणतेही वाजवी कारण नसतांना शासननिर्णय निर्गमित करण्यास खूपच विलंब लावण्यात आला. **महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाने आंदोलनाची नोटीस दिल्यावर उशीराने कां होईना १३ मे १९९९ ला माध्यमिक शिक्षकांना पाचवा वेतन आयोग लागू करण्याचा शासननिर्णय निर्गमित झाला.** त्यात अनेक दोष असले तरी १ जानेवारी १९९६ पासून नवीन वेतनश्रेणी लागू करण्यात आली.

हे सारे करीत असतांना विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांकडे अत्यंत आकसबुद्धीने पाहणाऱ्या शासनाने याबाबतचा शासननिर्णय अजूनही निर्गमित केलेला नाही त्याचा परिणाम असा झालेला आहे की एस.एस.सी व डी.एड. प्रशिक्षित प्राथमिक शिक्षकाला ४५००-७००० तसेच बी.एड किंवा डी.एड. सह प्रशिक्षित पदवधिर प्राथमिक शिक्षकाला ५५००-९००० ही वेतनश्रेणी सध्या मिळत असून त्याचवेळी विद्यापीठातून व महाविद्यालयातून काम करणाऱ्या पी.एच.डी. धारक "रिडर"ला मात्र ३७००-५७०० या वेतनश्रेणीत काम करावे लागत आहे. **महाराष्ट्र शासनाने विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना अत्यंत तुच्छतेची वागणूक दिलेली आहे. उच्च शिक्षणाचे आपल्या दृष्टीने काही महत्त्व नाही, ही जी भावना या वागणुकीतून व्यक्त होते याबद्दल व्यक्त करावी तेवढी चिंता थोडीच आहे.**

"तेव्हा साधारणपणे १५ जून,१९९९ च्या आत यासंबंधीचा निर्णय शासनाने घोषित करावा असा माझा निर्देश आहे.... १५ जून १९९९ पर्यंत माझ्या या निर्देशाची अंमलबजावणी करता येणे शासनास शक्य नसेल तर ते का शक्य झाले नाही वा होऊ शकत नाही. त्यात काय अडचणी आहेत याची स्पष्ट कल्पना समक्ष मला भेटून आणि लेखी स्वरुपात देखील आपण मला द्यावी." असे स्पष्टपणे विधानपरिषदेच्या मा. सभापतींचे आदेश असतांना व "**सभापती महोदय, अर्थात जो निर्णय होणार आहे, तो कॅबिनेटसमोर जाणार आहे.** १५ जून पर्यंत करावयाचे आहे." असे खुद्द सभागृहात मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी कबूल केलेले असतांना त्यांनी ते आश्वासन पाळले नाही. १५ जून १९९९ पर्यंत त्यांनी आदेशही काढला नाही व आदेश काढण्यामध्ये कोणत्या अडचणी आहेत? किंवा शासननिर्णय निर्गमित न होण्याची कारणे काय आहेत ते सुद्धा लेखी कळविले नाही. **शासनाच्या दुर्दैवी वर्तनातून उमटून दिसणारा सांसदिय लोकशाहीच्या प्रथा व परंपरा याबद्दलचा लोकविलक्षण उध्दटपणा हा लक्षणीयच म्हणावा लागेल.**

"राज्य शासकीय व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेण्या सुधारण्याकरिता राज्य शासनाकडून स्वतंत्र वेतन आयोग नियुक्त न करता केंद्र शासन जेव्हा जेव्हा केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी वेतन आयोग नियुक्त करील, तेव्हा तेव्हा त्या वेतन आयोगाच्या शिफारशीवरील केंद्र शासनाचे वेतन विषयक निर्णय राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या तुलनीय प्रवर्गांना लागू करण्यात येतील. वेतन निश्चितीचे सूत्र देखील केंद्र शासनाप्रमाणे असेल." **असा धोरणात्मक निर्णय महाराष्ट्र शासनाने डिसेंबर १९७७ मध्ये घेतलेला होता, तो आजतागायत बदललेला नाही**, असे असता पाचव्या

**२० ऑक्टोबर १९९९ रोजी सबंध महाराष्ट्रभर जिल्हाधिकारी कचेऱ्यांवर निषेध मोर्चे**

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATION**
**University Club House, B Road, Churchgate, Bombay-400 020.**

**Prof. C.R.Sadasivan,** President — Prof. Sambhaji Jadhaw, Gen Secretary

**Dated : 27th September, 1999**

Shri. Datta Rane,
Hon'ble Minister for Higher & Tech. Education
Maharashtra State,
Mantralaya, Mumbai-400 032.

Dear Hon'ble Minister :

You might be aware that in connection with the implementation of the central orders on the revision of pay-scales of University & Degree College teachers in Maharashtra, the MFUCTO has been in correspondence with Shri. Manohar Joshi, when he was the Chief Minister as also with you when you were the Hon'ble Minister for Higher and Technical Education right from August 1998. Thereafter, on Shri Narayan Rane taking over as the chief Minister of our State, the MFUCTO has sent letters to him also in the same connection. We also had a short meeting with him in the presence of Prof. N.S. Pharande, Hon'ble Chairman of the Legislative Council. The MFUCTO had also sent to you notice about the intention of the University and college teachers in the State to proceed on an indefinite strike starting from 21st July 1999. However, in view of the election notification for the Lok Sabha to begin with and thereafter for the Maharashtra State Legislative Assembly, the MFUCTO executive Committee decided not to proceed with the said strike but to hold the same in abeyance till the code of conduct stood withdrawn. It was hoped that the government orders in the meanwhile would be issued, and in any case, as soon as the code of conduct was withdrawn, till today the government orders in that respect are not released and the injustice and humiliation of the university & degree college teachers continues unredressed inasmuch as though a class IV employee is appointed on a basic pay of Rs. 2550, an university and/ or college Lecturer even today is appointed on a basic pay of Rs. 2200.

The Executive Committee and the General Council of the MFUCTO which met on Sunday, 26th Sept. 1999 in Mumbai to discuss the situation, unanimously resolved to recommence its suspended movement. A Copy of the **Resolution of the MFUCTO (in Marathi) is enclosed.** Accordingly, the MFUCTO will be staging a one-day Demonstration all over the State on Wednesday, 20th October 1999 of University and degree college teachers to be followed by the indefinite strike commencing from Wednesday, 8th December 1999.

This communication is being sent to you as an intimation of the MFUCTO struggle.

Yours faithfully

C.R.Sadasivan, President — **MFUCTO** — Sambhaji Jadhaw, Gen.Secretary

**उच्च शिक्षण व्यवस्थेमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींची अशी सामुहिक मानखंडना यापूर्वी महाराष्ट्रामध्ये कधीही झाली नव्हती.**

वेतन आयोगाच्या शिफारशी फक्त विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना लागु न करण्याचा शासनाचा निर्णय उच्च शिक्षणाविषयीचा आकस स्पष्ट करणारा आहे.

दिनांक २२ जुन १९९९ रोजी विधानभवनामध्ये मा. सभापतींच्या कार्यालयामध्ये व त्यांच्या उपस्थितीमध्ये मा.मुख्यमंत्र्यांचे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या शिष्टमंडळाशी जे बोलणे झाले, त्यावेळी "दोन दिवसांमध्ये याबाबतचा निर्णय घेऊ व हा निर्णय अनुकूल असेल" असे स्वतः मा. मुख्यमंत्र्यांनी सांगितले असतांना त्यांनी आपला शब्द पाळला नाही ही अत्यंत अशोभनिय बाब होय. "याबाबतची फाईल आपल्याकडे अजून आलेली नाही" अशी माहिती मा. मुख्यमंत्र्यांनी मा. सभापतीसमक्ष शिष्टमंडळाला दिली व आपल्या स्विय सहाय्यकांना बोलावून "ती फाईल पहा व उद्या माझ्या समोर ठेवा" असे आदेशही दिले. वस्तुतः दिनांक १४ जून १९९९ रोजीच मा. मुख्यमंत्र्यांनी हे प्रकरण मंत्रिमंडळासमोर ठेवण्यास मान्यता देणारी स्वाक्षरी केली होती, असे असतांना "ही फाईल आपल्यापर्यंत आलीच नाही." अशी संपूर्णपणे असत्य माहिती शिष्टमंडळाला त्यांनी द्यावी याबाबत आम्हाला तिव्र दुःख होत आहे. **आपल्या वैयक्तीक जिवनामध्ये उच्च शिक्षणाशी मा. मुख्यमंत्र्यांचा अजिबात संबंध आला नाही याची शिक्षा उच्च शिक्षणामध्ये काम करणाऱ्या शिक्षकांना होता कामा नये याची त्यांनी स्वतः काळजी घेतली पाहिजे.**

महाराष्ट्रातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना शासनाच्या या अत्यंत आकसपूर्ण धोरणामुळे अत्यंत अपमानास्पद व मानखंडना करणारी वागणूक दिली गेली आहे. सावत्रिक निवडणूकीच्या कामाला सहाय्य करणे हे आता कायद्याने सर्व शिक्षकांकरिता बंधनकारक केले असून निवडणूकीच्या कामाच्या जबाबदारीचे उत्तरदायित्व हे पदपरत्वे वेतनश्रेणीवर आधारित असते. कारकून असलेल्या "प्रिसायडिंग ऑफीसर"च्या हुकूमतीखाली विद्यापीठातील रिडरला तिसऱ्या क्रमांकाचा पोलींग ऑफीसर म्हणून काम करावे लागले. अधिव्याख्यात्याच्या पदावर अनेक वर्षे सेवा केलेल्या व्यक्तींला चौथ्या क्रमांकाचा "पोलींग ऑफीसर" म्हणून दिवसभर तर्जनीला काळी शाई लावण्याचे काम देण्यात आले. **उच्च शिक्षण व्यवस्थेमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींची अशी सामुहिक मानखंडना यापूर्वी महाराष्ट्रामध्ये कधीही झाली नव्हती.**

सबंध विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षणव्यवस्थेच्या शिरोभागी विद्यापीठाचे कुलपती या नात्याने विधिमयरित्या स्थानापन्न असलेल्या महाराष्ट्राच्या मा. राज्यपालांनी याबाबतीत काहीच हस्तक्षेप करु नये हे अत्यंत खेदजनक आहे. भारतातील सर्व राज्यांच्या मा. राज्यपालांचे वेतन १९८२ च्या याबाबतच्या कायद्यामध्ये बदल करुन ११ हजार रुपयावरुन ३६ हजार रुपये करण्यात आले आहे. हा बदल प्रत्यक्ष १९९८ मध्ये करण्यात आलेला असला तरी तो पूर्वलक्षी प्रभावाने १ जानेवारी १९९६ पासून लागू करण्यात आलेला आहे. मा. राज्यपाल हे एकाच वेळी सर्व विद्यापीठांचे कुलपती असतात व त्याचवेळी ते राज्याचे घटनात्मक प्रमुख असतात, त्या पदाचा दर्जा व प्रतिष्ठा कायम राखण्यासाठी उपरोक्त वेतनवाढ होणे आवश्यक होते असेच कोणीही म्हणेल, मात्र विद्यापीठाच्या कुलगुरूंची नेमणूक ७८०० रू. या निश्चित वेतनावर, तर त्याचवेळी कुलगुरूंचे स्वीय सचिव म्हणून काम पहाणाऱ्या सहाय्यक कुलसचिवांची नेमणूक मात्र ८००० रूपयावर होत आहे. हा प्रकार मा. कुलपतींनी उघड्या डोळ्याने नुसता पहात बसावा हे अत्यंत अयोग्य आहे हे नमुद करणे आवश्यक वाटते.

"शिक्षक मंडळी आहेत ती धिराने घेतील..... शासनाला कदाचित असे वाटले असेल की, शिक्षक मंडळी आहेत ती धिराने घेतील. दुसरा कामगार असता तर तो नाही म्हणाला असता. म्हणून शासनाचा असा विचार झाला असेल......." "आपल्याला माहिती आहे की, शिक्षक संयमी आहेत. त्यांची आपुलकी आपल्याबरोबर राहील." असे उद्गार खुद्द उच्च शिक्षण मंत्र्यांनी विधानपरिषदेत काढले आहेत पण संयमाला सुद्धा काही मर्यादा असतात हे त्यांनी विसरता कामा नये. त्यांच्या या उपरोक्त उद्गारानंतर निवडणूका जाहिर झाल्यामुळे २१ जुलै १९९९ पासून सुरु होणारे बेमुदत संप आंदोलन या महासंघाने आवरून घरले. निवडणूकीच्या आचार संहितेच्या काळात वेतनपुनर्रचनेबाबतचे अनेक निर्णय केंद्र शासनाने व राज्य शासनाने घेतल्याचे सर्वांनाच ठाऊक आहे.

विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांची मानहानी करणारी, तसेच एकूणच उच्चशिक्षणाची लज्जास्पद असलेली ही परिस्थिती तात्काळ संपुष्टात आणण्याचा ठाम निर्धार मुंबई येथे दिनांक २६.९.१९९९ रोजी भरलेल्या जनरल कौन्सिलच्या या सभेत व्यक्त करण्यात येत आहे. **एक रुपयाचेही केंद्र शासनाचे सहाय्य मिळत नसतांना २० लाख कर्मचाऱ्यांना जे लागू केले, ते ७२० कोटी रुपयांचे अर्थसहाय्य केंद्रशासनाकडून एक रकमी मिळत असतांना विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना लागू न करण्याच्या शासनाच्या धोरणाचा तिव्र निषेध** म्हणून (अ) बुधवार, दिनांक २० ऑक्टोबर १९९९ रोजी सबंध महाराष्ट्रभर जिल्हाधिकारी कचेऱ्यांवर निषेध मोर्चे काढण्यात येतील आणि निवेदने सादर करण्यात येतील. (ब) बुधवार, दिनांक ८ डिसेंबर १९९९ पासून बेमुदत संपास शांततेच्या मार्गाने प्रारंभ करण्यात येईल.

*******

**NAGPUR UNIVERSITY TEACHERS'ASSOCIATION**

### २०.१०.९९ रोजी निषेध मोर्चे व ८ डिसेंबर ९९ पासून बेमुदत संप आंदोलन तपशिल

*महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या (MFUCTO) निर्णयाप्रमाणे प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर त्या त्या जिल्ह्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक दुपारी १२.०० वाजता निषेध मोर्चा नेतील*

### आंदोलनासंबंधी जिल्हा युनिट व स्थानिक युनिटच्या बैठकी व दौरे : सूचना

(१) संघटनेच्या जिल्हा युनिटच्या व स्थानिक युनिटच्या तातडीच्या बैठकी घेण्यात याव्यात.

(२) जिल्हा पदाधिकाऱ्यांनी आपापल्या जिल्ह्याचा दौरा करावा. सर्व महाविद्यालयाच्या ठिकाणी सभा घेऊन सर्व शिक्षकांना कार्यक्रमाची कल्पना द्यावी.

(३) दिनांक २० ऑक्टोबर १९९९ रोजी होणाऱ्या जिल्ह्याच्या ठिकाणी निषेध मोर्चा कोणत्या ठिकाणाहून निघेल ते स्थळ निश्चित करावे व सर्वांना त्याची कल्पना द्यावी.

(४) निश्चित केलेल्या ठिकाणाहून मोर्चा दुपारी बरोबर १२.०० वाजता काढावा. या वेळेत बदल करू नये.

(५) जिल्हाधिकारी यांचे कार्यालयाला उपरोक्त आंदोलनाबाबतची लेखी पूर्वसूचना जिल्हा/स्थानिक पदाधिकाऱ्यांनी द्यावी.

(६) शासनाच्या धोरणाचा निषेध म्हणून शासनाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयावर निषेध व्यक्त करणारा मोर्चा नेणे हे आंदोलनाचे स्वरुप असेल.

**- E.H.Kathale,** Secretary, NUTA

# ८ डिसेंबर १९९९ पासून बेमुदत संप

# MINUTES

## of the General Body Meeting of NAGPUR UNIVERSITY TEACHERS'ASSOCIATION held at 12.00 noon on *SUNDAY, the* 19th September,1999 at Shri. Shivaji Arts & Commerce College, Amravati.

General Body of Nagpur University Teachers' Association met at 12.00 noon on Sunday, the 19th September,1999 at Shri. Shivaji Arts & Commerce College, Amravati. Prof.B.T.Deshmukh, President was in the chair. The membership numbers of the members present at the meeting are as follows :-

017, 044, 045, 048, 058, 060, 065, 068, 072, 080, 090, 101, 102, 112, 113, 129, 131, 136, 137, 147, 150, 153, 154, 158, 159, 161, 164, 166, 172, 176, 181, 183, 185, 188, 190, 194, 195, 220, 221, 222, 228, 232, 233, 234, 245, 254, 257, 260, 263, 267, 269, 291, 302, 307, 313, 316, 317, 370, 380, 388, 389, 409, 425, 426, 430, 433, 438, 444, 445, 450, 452, 491, 494, 496, 509, 525, 557, 559, 581, 622, 625, 650, 661, 666, 670, 672, 687, 698, 719, 721, 723, 724, 725, 729, 729, 749, 762, 807, 867, 868, 875, 892, 893, 893, 909, 979,

1016, 1037, 1039, 1052, 1055, 1107, 1113, 1118, 1119, 1121, 1122, 1124, 1141, 1143, 1158, 1161, 1177, 1192, 1193, 1203, 1205, 1210, 1233, 1251, 1270, 1319, 1340, 1351, 1358, 1361, 1362, 1368, 1382, 1394, 1395, 1406, 1414, 1423, 1424, 1429, 1433, 1444, 1445, 1485, 1525, 1526, 1529, 1538, 1551, 1595, 1611, 1626, 1627, 1629, 1630, 1631, 1632, 1639, 1641, 1649, 1651, 1658, 1694, 1709, 1727, 1733, 1781, 1792, 1795, 1846, 1849, 1861, 1865, 1879, 1880, 1885, 1898, 1902, 1906, 1907, 1959, 1961, 1962, 1963,

2002, 2007, 2017, 2036, 2038, 2046, 2047, 2048, 2049, 2107, 2108, 2120, 2133, 2136, 2137, 2138, 2154, 2157, 2243, 2254, 2261, 2262, 2271, 2290, 2291, 2307, 2317, 2318, 2319, 2322, 2323, 2324, 2325, 2333, 2337, 2338, 2340, 2343, 2344, 2375, 2398, 2399, 2400, 2406, 2407, 2425, 2427, 2428, 2430, 2434, 2440, 2455, 2468, 2474, 2477, 2478, 2479, 2488, 2492 ,2497,2500 ,2511, 2514,2516 ,2526 ,2569 ,2581 ,2582, 2585, 2586 ,2587, 2589,2607 ,2612 ,2656 ,2664 ,2666 ,2693, 2720 ,2742, 2809,2810 ,2813, 2814 ,2815 ,2817 ,2839 ,2853, 2855, 2863,2866 ,2867 ,2872 ,2878 ,2882 ,2883 ,2888, 2892, 2894,2900 ,2931 ,2938 ,2944 ,2960 ,2962 ,2974 ,2975, 2984,

3006 ,3015 ,3032, 3033 ,3034 ,3035 ,3079 ,3084, 3085, 3087 ,3231 ,3232 ,3246 ,3258 ,3276 ,3277 ,3279, 3291, 3297 ,3299 ,3300 ,3303 ,3311 ,3319 ,3321, 3324, 3326 ,3327, 3337 ,3341 ,3351, 3368 ,3374 ,3375 ,3377, 3379 ,3385 , 3391 ,3400 ,3401 ,3403 ,3411 ,3414 ,3423, 3424, 3427 ,3432, 3446 ,3451 ,3463 ,3464 ,3467 ,3469, 3471 ,3471 ,3476 , 3477 ,3480 ,3492, 3494 ,3498 ,3501, 3504 ,3512 ,3518 ,3521, 3527 ,3529 ,3531 ,3534 ,3537, 3538 ,3546, 3550 ,3552, 3553, 3555 ,3562 ,3563 ,3573, 3582 ,3588 ,3593 ,3611 ,3617, 3619, 3620, 3630 ,3632, 3637 ,3639 ,3641 ,3645 ,3667, 3668 , 3679 ,3681 ,3686, 3696 ,3699 ,3700, 3704 ,3706 ,3708, 3733, 3734 ,3762, 3765 ,3767 ,3780 ,3783 ,3784 ,3792 , 3795 , 3796

Agenda of the General Body meeting was circulated on pages 85 & 86 of 1999 NUTA Bulletin. Additional Agenda ( of the General Body Meeting of Nagpur University Teachers' Association to be held at 12.00 noon on Sunday, the 19th September 1999 at Shri. Shivaji Arts & Commerce College, Amravati.) was circulated to members as on pages 91 to 94 of 1999 Ex-File.

### ITEM NO. 257 :
### *CONFIRMATION OF MINUTES :*

**Confirmed** the minutes of the General Body meeting of Nagpur University Teachers' Association held at 12.00 noon on Sunday, the 6th June, 1999, at Amolakchand Mahavidyalaya, Yavatmal.

*Note :- 1) Copy of the minuites was Circulated on pages 80 to 81 of 1999 NUTA Bulletin.*

*2) Corrections, if any, were invited in the copy of the Minutes of the General Body Meeting of Nagpur University Teachers'Association held at 12.00 noon on Sunday, the 6th June, 1999, at Amolakchand Mahavidyalaya, Yavatmal, vide No.CIM/6 Dated 01.08.1999 published on page 84 of 1999 Nuta Bulletin. No correction was received.*

### ITEM NO. 257 (A)
### *PASSING AWAY OF DR. L.B. KENNY*

अध्यक्षांनी डॉ.एल.बी.केणी यांच्या दुःखद निधनाबद्दल मांडलेला पुढील शोकप्रस्ताव **सम्मत करण्यात आला :-**

"This meeting of the General Body of NUTA places on record its deep sense of sorrow at the passing away of Dr. Liladhar B. Kenny, former President of the BUCTU and the first president of the MFUCTO , in Mumbai on 5th July 1999. Dr. Kenny, by his devotion to the cause of education and selfless service to the teaching & student community, had earned for himself a permanent place in the history of teachers movement. He belonged to the most progressive section of historians in the country whose search for truth in history was uncompromising. It is his strong commitment to the cause of education and of the teaching and student community that enabled him to face fearlessly the strong arm of the central and state governments which had imprisoned him for 15 months without any trial under the MISA during the dark days of the emergency. Dr. Kenny's extreme sacrifice during this period did not go in vain but in fact

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**
***मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२***
*क्रमांक एनजीसी १७९८/१९९५४/(४६४५)विशी-४*
**दिनांक : २५ ऑगस्ट १९९९**

प्रति,
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य पुणे

**विषय :** कार्यभाराअभावी अतिरिक्त ठरलेल्या महिला प्राध्यापकांना सामावून घेण्याबाबत.

कृपया उपरोक्त विषयावरील आपले पत्र क्रमांक एनजीसी १९९८/प्राचार्य/संघटना/बैठक/पुणे/मवि-१ दिनांक १६.९.९८ पहावे.

२. शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग क्रमांक संकीर्ण - १०९६/प्रकरण ३०/कार्या-२ दिनांक १ ऑगस्ट १९९७ अन्वये शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित संस्थामधील सेवेमध्ये भरतीसाठी महिला करीता ३० टक्के जागा आरक्षित ठेवण्याबाबतचे निर्गमित करण्यांत आलेले आदेश विद्यापीठे व सलग्नित महाविद्यालयांना दिनांक ८ डिसेंबर १९९७ च्या आदेशान्वये लागू करण्यांत आले आहेत. तसेच कार्यभारा अभावी अतिरिक्त ठरणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेतांना, **त्यांच्या बदल्या इतर महाविद्यालयांत करण्यांत येतात त्यामुळे बरेचसे कौटुंबिक प्रश्न निर्माण होतात. अशा प्रकारची तक्रार एम.फुक्टो या संघटनेकडून शासनास प्राप्त झालेली आहे.** शासनाने यावर पूर्ण विचारांती असा निर्णय घेतला आहे की, जर महिला कर्मचारी अतिरिक्त ठरल्यामुळे त्यांची बदली दुसऱ्या ठिकाणी होत असेल व त्यामुळे संस्थेतून महिलांकरिता एकूण असलेले ३० टक्के आरक्षणाचे प्रमाण कमी होत **असेल तर अशा प्रकारामध्ये महिला कर्मचाऱ्यांना त्या महाविद्यालयातून दुसरीकडे बदली करण्यांत येवू नये.** त्या ऐवजी या महाविद्यालयांत त्यांना जेष्ठ असणाऱ्या व त्या विषयाच्या बिगर मागासवर्गीय पुरुष शिक्षकांची बदली इतर महाविद्यालयांत करण्यात यावी. आपणास विनंती की, याबाबच्या सूचना सर्व विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांना देण्यांत याव्यात व त्याचे पालन केले जाईल याची आपण कृपया खबरदारी घ्यावी.

(अ.मा. भट्टलवार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत सर्व विभागीय सहसंचालक, (उच्च शिक्षण)

helped in raising the status and dignity of the teaching community in the entire country. In his death, the teachers' movement has lost a fearless leader and a champion of the teachers' cause."

अध्यक्षांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. सभेने दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून दिवंगत डॉ.एल.बी.केणी यांना आपली आदरांजली वाहिली. **सम्मत केलेल्या शोकप्रस्तावाची प्रत संघटनेच्या वतीने सचिव शोकाकूल कूटूंबियांकडे पाठवितील असे अध्यक्षांनी सांगितले.**

## ITEM NO. 258 :
## *APPROVAL TO THE AUDITED STATEMENT.*

**Considered and approved** the Audited Balance Sheet and Income and Expenditure Account of the Association for the year ended on 31st March, 1999.

***Notes*** *: (i) The copy of the Audited Balance sheet and Income and Expenditure Account of the Association for the said Financial year was circulated on page 88 & 89 of 1999 NUTA Bulletin.*

*(ii) The Audited Balance sheet and Income and Expenditure Account were placed before the General Body by Prof. S.A.Tiwari, Treasurer, on behalf of the Executive Committee.*

## ITEM NO. 259 :
## *STATEMENT ON FIXED SECURITIES POSITION :*

**Noted** the Statement no.10 showing the position of the Fixed Securities of the Association as on 31st March 1999.

***Note :*** *(i) Statement no.10 regarding the fixed securities of the association as on 31st March 1999 was circulated on page 102 of 1999 NUTA Bulletin.*

*(ii) The Statement showing the position of the Fixed Securities of the Association as on 31st March 1999, was placed before the General Body by Prof. S.A.Tiwari, Treasurer, on behalf of the Executive Committee.*

## ITEM NO. 260 :
## *AMENDMENT TO THE DISTRICT UNIT BYE-LAWS.*

**Considered and approved** the following amendments to the District Unit Bye-laws; namely :-

(1) In para 3 of the bye-laws the words "The Association may have nine district units(Subject to the provision of para 4 of by-laws) i.e." be substituted by the following words, Namely :-

"The Association may have the following district units :-"

(2) In para 3 after the entry at Sr.No. 9, the following entries may be added, Namely :-

"10. Gadchiroli
11. Washim
12. Gondia"

(3) In para 5 the words "Nagpur University" may be substituted by the words "Nagpur and Amravati University as the case may be"

(4) The existing para 6 of the bye-laws may be substituted by the following para, Namely:-

"6) Each district unit shall have an Executive Committee consisting of one President, One Vice President, One Secretary, One Joint Secretary and Three members elected by the members of the association from that district from amongst themselves."

***Notes :*** *(1) The Existing district- Unit bye-laws, as approved by the General Body, vide item No. 2, in its meeting held on 29th November 1976 and further amended by the proposal, printed on page 40 of 1980 Nuta Bulletin, approved by the General Body vide item No. 29 in its meeting held on 12th October 1980. Originally printed on page 70 of 1976 Nuta Bulletin and reproduced on page 4 and 5 of 1978 Nuta Bulletin. and again on page 51 of 1993 Nuta Bulletin and were circulated now on page 95 of 1999 NUTA Bulletin.*

## ITEM NO. 261 :
## *TALUKA UNIT BYE-LAWS.*

**Considered and approved** the Taluka Unit Bye-laws.

*Note : Taluka Unit Bye- laws were circulated on page 94 of 1999 Nuta Bulletin.*

## विषय क्रमांक २६२
## *नुटा बुलेटीनचा रजत जयंती विशेषांक काढण्याबाबत*

**(अ) प्रा.व्ही.एस.भोयर ह्यांनी पुढील प्रस्ताव मांडला :-**

"नुटा या संघटनेचे मुखपत्र "नुटा बुलेटीन" पुढील वर्षी २५ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. नुटा बुलेटीनने शिक्षण क्षेत्रातील महत्त्वाची माहिती वस्तुस्थितीसह व अनेक निर्णय, न्यायालयीन निवाडे यासह समाजापर्यंत पोहचविण्याचे महत्त्वाचे कार्य सातत्याने गेल्या २५ वर्षापासून केले आहे. या निमित्ताने इ.स. २००० मध्ये नुटा बुलेटीनचे रजत जयंती वर्ष साजरे करण्यात यावे व त्यानिमित्ताने नुटा बुलेटीनचा रजत जयंती वर्ष अंक प्रकाशित करून त्यात गेल्या २५ वर्षात नुटा बुलेटीनमधून जी माहिती प्रसिद्ध करण्यात आली त्याविषयीची अनुक्रमणिका शीर्षक रुपाने खालील (Index to the contents of NUTA Bulletin 1976-2000) मथळ्याखाली प्रसिद्ध करण्यात यावी."

**(ब)** पृष्ठ ८६, विषय क्रमांक २६२ वरील प्रा.व्ही.एस.भोयर यांच्या उपरोक्त प्रस्तावाला **प्रा.सुभाष गवई यांनी**, १९९९ च्या ई-एक्स फाईलच्या पृष्ठ ९१ व ९२ वर प्रसृत करण्यांत आलेली, **सुधारणा मांडली**

**(क)** पृष्ठ ८६, विषय क्र. २६२ वरील प्रस्तावाला प्रा. सुभाष गवई यांनी सुचविलेल्या (१९९९ च्या ई-एक्स फाईलच्या पृष्ठ ९१ व ९२ वर प्रसृत करण्यांत आलेल्या) **सुधारणेला प्रा.पी.पी.पाळेकर यांनी पुढील सुधारणा सुचविली :-**

"(१) सुधारणेच्या मसुद्यातील परिच्छेद (दोन) च्या उपपरिच्छेद १२ नंतर पुढील परिच्छेद जोडावा. :-

(१३) "आयुर्वेद महाविद्यालय विशेषांक" या विशेषांकामध्ये अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयाकरिता नियमित वेतन व्यवस्था लागू होणे, यू.जी.सी. ची सुधारित वेतनश्रेणी लागू होणे, प्रयोगदर्शकांना अधिव्याख्याता म्हणून पुनर्नामित करणे, शिक्षकांची पदे भरण्यावरील मनाई काढून टाकणे व ती भरण्यास मान्यता मिळणे, पेंन्शन ग्रॅच्युईटी व तद्नुषंगिक इतर प्रश्न याबाबत सभागृहात झालेल्या चर्चा, त्या अनुषंगाने निर्गमित झालेले सर्व शासननिर्णय यांचा समावेश असावा.

(२) सुधारणेच्या मसुद्यातील परिच्छेद (दोन)च्या विद्यमान उपपरिच्छेद "१३"चे "१४" असे पुनर्क्रमांकन करण्यांत यावे."

**(ड)** चर्चेनंतर अध्यक्षांनी एक एक बाब सभागृहाच्या निर्णयार्थ ठेवली. प्रा.पी.पी.पाळेकर यांनी सुचविलेली उपरोक्त "सुधारणेला सुधारणा" **सम्मत करण्यात आली** त्यानंतर या सुधारणेसह प्रा.सुभाष गवई यांनी मांडलेली सुधारणा सभागृहाने **सम्मत केली.** त्यानंतर त्या सुधारणेसह प्रा.व्ही.एस.भोयर यांचा मुळ प्रस्ताव **सम्मत करण्यात आला.**

**(इ) सभागृहाने अंतिमतः सम्मत केलेला प्रस्ताव पुढीलप्रमाणे :-**

"**(एक)** नुटा या संघटनेचे मुखपत्र "नुटा बुलेटीन" पुढील वर्षी २५ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. नुटा बुलेटीनने शिक्षण क्षेत्रातील महत्त्वाची माहिती वस्तुस्थितीसह व अनेक निर्णय, न्यायालयीन निवाडे यासह समाजापर्यंत पोहचविण्याचे महत्त्वाचे कार्य सातत्याने गेल्या २५ वर्षापासून केले आहे. या निमित्ताने इ.स. २००० मध्ये नुटा बुलेटीनचे रजत जयंती वर्ष साजरे करण्यात यावे व त्यानिमित्ताने नुटा बुलेटीनचा रजत जयंती वर्ष अंक प्रकाशित करून त्यात गेल्या २५ वर्षात नुटा बुलेटीनमधून जी माहिती प्रसिद्ध करण्यात आली त्याविषयीची अनुक्रमणिका शीर्षक रुपाने खालील (Index to the contents of NUTA Bulletin 1976-2000) मथळ्याखाली प्रसिद्ध करण्यात यावी."

**(दोन)** प्रस्तावात सुचविल्याप्रमाणे Index to the contents नमूद असलेला विशेषांक तर काढावाच पण त्याबरोबरच पुढील मथळ्यांचा किंवा मजकुराचा समावेश असलेले अनेक विशेषांक नुटा बुलेटीनच्या रजत जयंती वर्षानिमित्त वर्षभर काढण्यात यावेत. ते पूढील प्रमाणे :-

१) "महत्वपूर्ण कागदपत्रे - विशेषांक" या विशेषांकात गेल्या २५ वर्षामध्ये

राज्यशासन किंवा केंद्र शासन आणि संघटना (अखिल भारतीय प्राध्यापक महासंघ, महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ किंवा नुटा) यांच्यामध्ये झालेले लेखी करार किंवा समझोतापत्र, किंवा यांच्याशी संबंधित विधानपरिषद सभागृहातील चर्चा व तत्सम अन्य महत्वपूर्ण कागदपत्रांचा समावेश करण्यात यावा.

२) महाराष्ट प्राध्यापक महासंघ व नुटा यांच्या संघटनात्मक वाटचालीची माहिती देणारा विशेषांक.

३) "नियमित वेतन व्यवस्था - विशेषांक." या विशेषांकामध्ये या व्यवस्थेचा उद्‌भव, तिचा विकास, त्याबाबत सभागृहात झालेल्या चर्चा, या व्यवस्थेशी संबंधित सर्व शासन निर्णय, यांचा समावेश असावा.

४) "सेवानिवृत्ती व्यवस्था व स्वेच्छा निवृत्ती व्यवस्था - विशेषांक." या विशेषांकामध्ये या व्यवस्था लागू होणे, त्याबाबत सभागृहात झालेल्या चर्चा, या व्यवस्थेशी संबंधित सर्व शासन निर्णय, यांचा समावेश असावा.

५) "वैद्यकीय खर्चाच्या परिपूर्तीची व्यवस्था - विशेषांक." या विशेषांकामध्ये या व्यवस्थेचा उद्‌भव, तिचा विकास, त्याबाबत सभागृहात झालेल्या चर्चा, या व्यवस्थेशी संबंधित सर्व शासन निर्णय, यांचा समावेश असावा.

६) "रजाप्रवास सवलत व्यवस्था - विशेषांक." या विशेषांकामध्ये या व्यवस्थेचा उद्‌भव, तिचा विकास, त्याबाबत सभागृहात झालेल्या चर्चा, या व्यवस्थेशी संबंधित सर्व शासन निर्णय, यांचा समावेश असावा.

७) "उजळणी वर्गाबाबतची व्यवस्था - विशेषांक." या विशेषांकामध्ये या व्यवस्थेचा उद्‌भव, या व्यवस्थेचा शासनाने केलेला गैरवापर त्याबाबत सभागृहात झालेल्या चर्चा, या व्यवस्थेशी संबंधित सर्व शासन निर्णय, यांचा समावेश असावा.

८) "नेटसेट पात्रतेची व्यवस्था - विशेषांक." या विशेषांकामध्ये या व्यवस्थेचा उद्‌भव, तिचा अनावश्यक विळखा, त्याबाबत सभागृहात झालेल्या चर्चा, या व्यवस्थेशी संबंधित सर्व शासन निर्णय, यांचा समावेश असावा.

९) "अतिरिक्त होणाऱ्या शिक्षकांना सेवासुरक्षिततेची व्यवस्था - विशेषांक." या विशेषांकामध्ये या व्यवस्थेचा उद्‌भव, तिचा विकास, त्याबाबत सभागृहात झालेल्या चर्चा, या व्यवस्थेशी संबंधित सर्व शासन निर्णय, यांचा समावेश असावा.

१०) "विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या सेवाशर्तीविषयक व्यवस्था - विशेषांक." या विशेषांकामध्ये या व्यवस्थेचे स्वरुप, त्याबाबत सभागृहात झालेल्या चर्चा, या व्यवस्थेशी संबंधित सर्व शासन निर्णय, यांचा समावेश असावा.

११) "महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ विशेषांक"

१२) विदर्भातील विविध विकासात्मक प्रश्नावर विधानपरिषदेमध्ये संघटनेच्या प्रतिनिधींनी घडवून आणलेल्या चर्चा व त्या प्रश्नांची सोडवणूक याची तपशीलवार माहिती नमूद असलेले विषयनिहाय विशेषांक

१३) "आयुर्वेद महाविद्यालय विशेषांक" या विशेषांकामध्ये अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयाकरिता नियमित वेतन व्यवस्था लागू होणे, यू.जी.सी. ची सुधारित वेतनश्रेणी लागू होणे, प्रयोगदर्शकांना अधिव्याख्याता म्हणून पुनर्नामित करणे, शिक्षकांची पदे भरण्यावरील मनाई काढून टाकणे व ती भरण्यास मान्यता मिळणे, पेंन्शन ग्रॅच्युईटी व तद्‌नुषंगिक इतर प्रश्न याबाबत सभागृहात झालेल्या चर्चा, त्या अनुषंगाने निर्गमित झालेले सर्व शासननिर्णय यांचा समावेश असावा.

१४) याशिवाय कार्यकारी मंडळ किंवा आमसभा ठरविल अशा प्रश्नांवरील विशेषांक

**(तीन)** वर्षभरात एवढे विशेषांक काढावयाचे तर विद्यमान संपादनाच्या व्यवस्थेला फार मोठे सहाय्य घ्यावे लागेल. त्यासाठी आवश्यकता वाटल्यास व आवश्यकतेप्रमाणे, अंकनिहाय स्वतंत्रपणे काम करू शकेल अशा संपादन सहाय्याची व्यवस्था उभी करण्यासाठी कार्यकारी मंडळाने विचार करावा.

## महाविद्यालयीन प्राध्यापकांच्या सेवानिवृत्तीचे "वय वर्ष" व "निवृत्तीचा प्रत्यक्ष दिनांक"

नागपूर व अमरावती विद्यापीठामध्ये संलग्न महाविद्यालयातून काम करणाऱ्या प्राध्यापकांच्या निवृत्तीचे "वय वर्ष" व "निवृत्तीचा प्रत्यक्ष दिनांक" हा "कॉलेज कोड ऑर्डीनन्स"ने ठरवून दिला आहे. त्याप्रमाणे शिक्षकांचे लेखी करार झालेले आहेत. मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने ३० जुलै १९९९ रोजी १९९९ च्या याचिका क्रमांक २६९४ मध्ये याबाबतीत पुढील प्रमाणे निर्णय दिला :-

"Hence prima facia the petitioner is entitled to continue to be in service till 30th April 2000. Therefore, the petitioner to be continued up to 30th April 2000 and to retire on that date."

२. मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने ३० जुलै १९९९ रोजी दिलेल्या निर्णयाची प्रत सोबत जोडून इतर सर्व शिक्षकांसाठी ऑर्डीनन्सच्या तरतुदीप्रमाणे आदेश काढावे ("Based on the above judgement, we have to request your honour to extend the applicability of this judgement to other similarly placed teachers in the colleges and accordingly issue directions to the affiliated Colleges.")अशी विनंती नुटाचे सचिव प्रा.डॉ.एकनाथ कठाळे यांनी नागपूर विद्यापीठाच्या मा. कुलगुरुंना दिनांक २ ऑगस्ट १९९९ च्या एका पत्रान्वये (पत्र १९९९ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ८७ पहा) केली होती.

३. अशाच प्रकारची विनंती दिनांक ४ ऑगस्ट १९९९ रोजी संघटनेचे सचिव डॉ. एकनाथ कठाळे यांनी अमरावती विद्यापीठाच्या मा. कुलगुरुंना एक पत्र ***(सहपत्र १)*** पाठवून केली होती. याचे मुख्य कारण असे की महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम १४ (५) मध्ये पुढील प्रमाणे तरतुद आहे :- "(5) It shall be the duty of the Vice-Chancellor to ensure that the provisions of the Act, Statutes, Ordinances and Regulations are strictly observed ...."

४. अमरावती विद्यापीठाच्या कुलगुरुंनी याबाबतीत कोणताही निर्णय न घेता दिनांक २१ ऑगस्ट १९९९ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीसमोर हा विषय ठेवला. विषय क्रमांक २६८ वर हा विषय जेव्हा चर्चेला आला त्यावेळी या विषयावर झालेली व्यवस्थापन परिषदेच्या कार्यवृत्तामधील नोंद याच अंकात स्वतंत्रपणे ***(सहपत्र २)*** दिलेली आहे. व्यक्तिशः स्वतःविषयी अमरावती विद्यापीठाच्या कुलसचिवांना प्रा.बी.टी.देशमुख यांनी पाठविलेले पत्र, ***(सहपत्र ३)*** विद्यापीठाचे नोटीफिकेशन ***(सहपत्र ४)*** याच अंकात अन्यत्र दिलेले आहे.

५. मा. नागपूर खंडपीठाने १९९९ च्या याचिका क्रमांक ३५३९, ३५४०, ३५५६ या प्रकरणांमध्ये असाच निर्णय दिलेला आहे. दिनांक २९.९.१९९९ रोजी दिलेल्या या निर्णयानुसार अकोटचे प्रा. भा.धों.वहादूरे, भंडाऱ्याचे प्रा.अरविंद शृंगारपूरे, यवतमाळचे गझनफरअली खान, पारशिवणीचे प्रा. सुरेश देशपांडे या अर्जदार प्राध्यापकांच्या प्रकरणांमध्ये "त्यांच्या सेवानिवृत्तीचा प्रत्यक्ष दिनांक ३० जून २००० राहील व त्या काळाचे त्यांच्या वेतनावरील अनुदान शासनाकडून देय असेल." असा अंतरिम आदेश मा. उच्च न्यायालयाने दिलेला आहे - **संपादक**

*सहपत्र १ :*

**NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION**

From
**Dr.E.H.Kathale,** 42/S/99
Secretary, **NUTA,** 4 August, 1999
N-162 Reshim Bagh, Nagpur-440 009.

To,
The Hon'ble Vice-Chancellor,
Amravati University,
Amravati.

Subject : Application of the judgement dated 30.7.1999 delivered by Hon'ble High Court, Nagpur to the similarly placed teachers in the University and affiliated Colleges.

Sir,

We have to submit that Nagpur Bench of Hon'ble High Court has in writ petition No. 2694 of 1999, delivered a judgement that the teachers in affiliated colleges who are retiring dering the mid-session and entitled to continue in services upto 30th April and retire on the last day of the session, (Copy enclosed as Annexure No. 1) as provided in article 38 of the ordinance No. 24 of the college code of Nagpur University read with schedule "A" (Ordinance No. 24 is applicable to Amravati University)

Based on the above judgement, we have to request your honour to extend the applicability of this judgement to other similarly placed teachers in the colleges and accordingly issue directions to the affiliated Colleges.

Thanking you,

Yours faithfully,
(E.H.Kathale)

Encl : Copy of the judgement dated 30.7.1999

**(चार)** वर्षभरात प्रसिद्ध होणाऱ्या प्रत्येक अंकातील पृष्ठांना एका मागून एकचे पृष्ठ क्रमांक व शिवाय वर्षाच्या शेवटी अनुक्रमणिका, अशा रीतीने सतत २५ वर्षे प्रकाशित होणारे संघटनेचे आपले स्वतःचे असे "नुटा बुलेटीन"सारखे पाक्षिक असणे हा केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील विद्यापीठ पातळीवर काम करणाऱ्या विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक संघटनेने चालविलेला संघटनात्मक प्रकाशनाचा वैशिष्ट्यपूर्ण असा दुर्मिळ उपक्रम असेल. पंचवीस वर्षाच्या पूर्णतेनंतर वर्षभर प्रकाशित होणाऱ्या उपरोक्त विशेषांकांनी या "नुटा बुलेटीन"च्या गौरवास्पद कामगिरीवर फार मोठा कळस चढेल. हे काम यशस्वीपणे पार पडावयाचे असेल तर त्यासाठी बरेच मोठे अर्थबळ उभे करावे लागेल ही गोष्ट स्पष्ट आहे. त्याबाबतचा प्रस्ताव पुढीलप्रमाणे :-

(१) विशेषांकासाठी जसे आपण जाहिरात घेतो, त्या धर्तीवर महाराष्ट्रातील महाविद्यालयांनी विशेषांकाच्या प्रकाशनामध्ये एक जाहिरात देऊन सहभागी व्हावे व सहकार्य करावे अशी विनंती महाविद्यालयाच्या प्राचार्यांना करण्यात यावी.

(२) विकासविषयक प्रश्नांसाठी काढल्या जाणाऱ्या विशेषांकामध्ये तो प्रश्न संबंधित असलेल्या गावातून, शहरातून, विभागातून जाहिरात मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात यावे.

(३) विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी या विशेषांकाचे दिर्घमुदती महत्त्व लक्षात घेता प्रत्येकी किमान १००० रुपयाचा सहभाग या कामामध्ये द्यावा. या कामामध्ये अशा स्वेच्छाधिन सहभागधारकाला या सर्व विशेषांकाचा एकत्र खंड किंवा वेगवेगळे खंड आठवण म्हणून देण्यात यावे.

(४) सेवानिवृत्त सहकारी प्राध्यापकांची एक बैठक घेवून या कामामध्ये त्यांच्याकडून काय सहकार्य मिळू शकते याबाबतचा शक्य असेल तो निर्णय घेण्यात यावा.

(५) या शिवाय अशा अर्थबळ उभारणीसाठी आवश्यक ती इतर उपाय योजना कार्यकारी मंडळाने करावी असेही ठरविण्यात येत आहे."

## विषय क्रमांक २६३
## *गुण वाढीचा निंदनीय प्रकार*

**(अ) प्रा. पी.पी.सोवनी ह्यांनी पुढील प्रस्ताव मांडला :-**

"नागपूर विद्यापीठातील गुण वाढविणे व खोट्या गुणपत्रिका सादर करणे या निंदनीय घटनेशी संबंधीत सर्व व्यक्तींना शक्य तितक्या लवकर शिक्षा होणे आवश्यक आहे. ही सभा या प्रकरणाशी संबंधीत सर्व घटकांचा निषेध करते."

**(ब)** पृष्ठ ८६, विषय क्रमांक २६३ वरील प्रा. पी.पी.सोवनी यांच्या प्रस्तावाला **डॉ. अ.शं. सातपुतळे यांनी** १९९९ च्या ई-एक्स फाईलच्या पृष्ठ ९२ व ९३ वर प्रसृत करण्यांत आलेली **सुधारणा मांडली**

**(क)** पृष्ठ ८६, विषय क्र. २६३ वरील प्रस्तावाला **प्रा. अ.शं. सातपुतळे यांनी सुचविलेल्या** (१९९९ च्या ई-एक्स फाईलच्या पृष्ठ ९२ व ९३ वर प्रसृत करण्यांत आलेल्या) **सुधारणेला डॉ. शशिकांत वाईकर यांनी पुढील सुधारणा सुचविली :-**

"(१) सुधारणेच्या मसुद्यातील परिच्छेद सात नंतर पुढील परिच्छेद (आठ) जोडावा :-

**(आठ)** शिक्षकांचे आणि उच्च शिक्षणाचे पावित्र्य कायम राखण्यासाठी उच्च शिक्षणास काळीमा फासणाऱ्या अशा प्रकाराविरुद्ध तालुका, जिल्हा आणि केंद्रीय पातळीवर आवश्यकतेनुसार त्या त्या वेळी व त्या त्या ठिकाणी त्वरीत आंदोलनात्मक पाऊल उचलण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात येत

*सहपत्र २ :*

**अमरावती विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २१ ऑगस्ट १९९९ रोजी झालेल्या बैठकीतील विषय क्रमांक २६८ वरील निर्णयाचे कार्यवृत्त**

"विषय क्रमांक २६८ वर मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने १९९९ च्या २६९४ या प्रकरणात दिलेल्या निर्णयाची बाब कार्यकारी परिषदेच्या समोर विचारार्थ आहे. याबाबत एक गोष्ट मला मा. अध्यक्षांच्या व सभागृहाच्या स्पष्टपणे लक्षात आणून द्यावीशी वाटते, ती अशी की या प्रकरणी होणाऱ्या अनुकुल निर्णयामुळे लाभधारक ठरणाऱ्या व्यक्तीमध्ये माझा बी.टी.देशमुख ही व्यक्ती या नात्याने प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष समावेश असू शकतो. अनुकुल निर्णयाचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष संभाव्य लाभधारक या नात्याने असा निर्णय व्हावा यासाठीच्या चर्चेमध्ये मी भाग घेणे यावर कायद्याने कोणतीही मनाई असल्याचे मला आढळून आले नाही तथापि व्यावहारिक विचार करता या चर्चेतील माझा सहभाग योग्य राहील असे मला वाटत नाही.

नागपूर विद्यापीठाने १९६२ मध्ये प्रसिद्ध केलेल्या CALENDAR VOLUME I च्या पृष्ठ ९५ वर COLLEGE CODE ORDINANCE मुद्रित करण्यात आला असून तो १ जुलै १९६१ पासून अमलात आल्याचे पहिल्याच परिच्छेदात नमुद आहे. सेवानिवृत्तीचे प्रत्यक्ष "वय-वर्ष" व "सेवानिवृत्तीचा त्यावर्षातील प्रत्यक्ष दिवस" या अध्यादेशाने ठरवून दिला आहे. त्याबाबतचा मा. उच्चन्यायालयाने दिलेला हा निर्णय आहे. अशाच प्रकरणात यापूर्वी सुद्धा ६.२.१९९१ रोजी 2436 of 1990 या प्रकरणांत मा. उच्च न्यायालयाने अशाच प्रकारचा निर्णय दिला आहे असे या निर्णयातच नमुद आहे." **असे निवेदन व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी केले व त्यानंतर त्यांनी पुढील प्रस्ताव मांडला :-**

"सदरहू अध्यादेशातील याबाबतच्या तरतुदींचे स्वरूप, या अध्यादेशाचा विधिमय दर्जा, मा. उच्च न्यायालयाने या व यापूर्वीच्या प्रकरणात दिलेले निर्णय, हे निर्णय फक्त संबधित अर्जदार असलेल्या एका व्यक्तीच्या संदर्भात तर लागू होतातच पण त्याबरोबरच तत्सम सर्वांना लागू पडणारे धोरण मा. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाने निर्धारित केले आहे किंवा कसे? याबाबत या ठिकाणी कोणताही निर्णय न घेता, उपरोक्त सर्व कागदपत्रावर आधारित, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम १४ (५) मध्ये नमुद केल्याप्रमाणे, **मा. अध्यक्षांनी याबाबत यथोचित निर्णय घ्यावा अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे.**"

प्रा.बी.टी.देशमुख यांनी मांडलेला **प्रस्ताव सम्मत करण्यात आला.**"

*सहपत्र ३ :*

**Prof.B.T.Deshmukh,**
Near, Vidarbha Mahavidyalaya, C:\win\sai.pm5-80
Amravati-444 6004 Date : 31.08.1999

To,
**The Registrar,**
Amravati University,
Amravati.

**Subject :** My retirement on 31.08.1999 due to super-annuation.

R/Sir

I am to inform you that consequent upon my super-annuation at the age of 60, my services, as a lecturer and Head of the Department in political Science, in Shri. Shivaji College, Amravati, came to an end with effect from to-day i. e. the 31st August 1999 A.N.

This is for your information and necessary action.

Yours Sincerely
**(B.T.Deshmukh)**
*Lecturer and Head of the Department*
*in political Science, in Shri. Shivaji College, Amravati*

**P.S. :** In this context I would like to make it clear that the above is the personal decision relating to myself only. The provision made in the schedule "A" i.e. Agreement, relating to the age of and the actual date of, retirement of a college a teacher, in the Ordinance No. 24 is quoted below :-

*"4. That the age of super-annuation will be sixty years, the actual time of retirement for the party of the first part to be last day of the academic year in which he attains the age of sixty".*

This is the correct existing position, regarding the retirement of the college teachers. Subsequent change, if there is any, made by competent legal instrument, shall be applicable with effect from the date of such change. But such change cannot be made applicable with retrospective effect to those who were already under the agreement and governed by the previous provisions, embedded in the ordinance 24.

******

आहे."

**(ड)** चर्चेनंतर अध्यक्षांनी एकएक बाब सभागृहाच्या निर्णयार्थ ठेवली. डॉ. शशिकांत वाईकर यांनी सुचविलेली उपरोक्त "सुधारणेला सुधारणा" **सम्मत करण्यात आली,** त्यानंतर या सुधारणेसह डॉ.अ.शं.सातपुतळे यांनी मांडलेली **सुधारणा सभागृहाने सम्मत केली.** त्यानंतर त्या सुधारणेसह प्रा.पी.पी.सोवनी यांचा मुळ प्रस्ताव **सम्मत करण्यात आला.**

**(इ) सभागृहाने अंतिमतः सम्मत केलेला प्रस्ताव पुढीलप्रमाणे :-**

"**(एक)** नागपूर विद्यापीठातील गुण वाढविणे व खोट्या गुणपत्रिका सादर करणे या निंदनीय घटनेशी संबंधीत सर्व व्यक्तींना शक्य तितक्या लवकर शिक्षा होणे आवश्यक आहे. ही सभा या प्रकरणाशी संबंधीत सर्व घटकांचा निषेध करते.

**(दोन)** केवळ या सर्व प्रकरणाचा तीव्र निषेध करूनच थांबता कामा नये तर या सर्व प्रकरणाची सी.बी.आय मार्फत चौकशी होऊन जे जे कोणी दोषी असतील त्यांना कठोर शिक्षा ठोठाविण्यात आल्या पाहिजेत अशी मागणी करण्यात येत आहे.

**(तीन)** ह्या प्रकरणातील दोषी व्यक्तींना हुडकून काढून त्यांचेवर कठोर कारवाई करण्यावरच थांबता येणार नाही तर त्याच बरोबर विद्यापीठाच्या प्रशासकीय व परीक्षा व्यवस्थेतील ज्या दोषांमुळे असे प्रकार घडणे शक्य झाले, त्या सर्व त्रूटी व दोष लक्षात घेऊन ही व्यवस्था संपूर्णपणे निर्दोष करण्याच्या विविध उपाययोजना विद्यापीठाने तातडीने हाती घेतल्या पाहिजेत अशी विनंती करण्यात येत आहे.

**(चार)** उपरोक्त उपाययोजना होत असतांना कोणताही दोष नसलेल्या व या यंत्रणेत प्रामाणिकपणे काम करणाऱ्या निरनिराळ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये, अधिकाऱ्यांमध्ये व पदाधिकाऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी व त्यांचे नितिधैर्य कोसळू नये यासाठी विद्यापीठाने त्वरित उपाय योजना केली पाहिजे,

**(पांच)** उपरोक्त परिच्छेदामध्ये नमूद केलेली उपाययोजना ही फक्त दर्शनी भागावर करण्यात आलेली वरवरची उपाययोजना आहे, हे स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक वाटते. इंजीनियरिंग व मेडिकल या विद्याशाखांबरोबरच इतरही विद्याशाखांमध्ये विनाअनुदान तत्त्वावर सुरू करण्यात आलेल्या "वरवर अत्यंत आकर्षक वाटणाऱ्या अशा खूपच महागड्या अभ्यासक्रमामुळे (यापुढे उल्लेख "असे अभ्यासक्रम" असा) गेल्या १०-१५ वर्षामध्ये जन्मास आलेल्या धनदांडग्यांच्या वर्गाने नागपूर विद्यापीठासह महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठांच्या परीक्षा व प्रशासकीय यंत्रणाशी केलेली व ते करीत असलेली दांडगाई व त्या यंत्रणा व व्यवस्था मोडून काढण्यातील या नवोदित धनदांडग्यांचा सहभाग यांची ताबडतोब न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे अशी मागणी हे सभागृह करीत आहे. मा. राज्यपालांनी ताबडतोबीने अशा न्यायालयीन चौकशीची व्यवस्था स्थापीत करावी अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे. या न्यायालयीन चौकशीमध्ये प्रामुख्याने पुढील मुद्यांची चौकशी व्हावी अशी मागणी करण्यात येत आहे. **धनशक्तीच्या व राजकीय शक्तींच्या आधारावर महाराष्ट्रातील विद्यापीठांमध्ये :-**

(१) विद्यापीठांनी शिफारस केलेली नसतांना विशेष शक्तींचा वापर करून अनेक "लाभदायक" अभ्यासक्रमांची महाविद्यालये सुरू करण्यामध्ये शासनाने ज्या संस्थांना परवानगी दिली त्या ठिकाणी खरोखरच असे अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी आवश्यक अशा सुविधा उपलब्ध होत्या काय?

(२) पदव्या, विषय किंवा विषयांचे समूह अनेक विद्यापीठांमध्ये मुळात अस्तित्वात नसतांना, त्यासाठीचा शिक्षकवर्ग विद्यापीठात उपलब्ध नसतांना, त्या विद्यापीठांना अशा पदव्या, असे विषय किंवा विषयसमुहांना अशा अभ्यासक्रमांसाठी संलग्निकरण देण्यास बाध्य करण्यात आले काय?

(३) असे अभ्यासक्रम चालवितांना या अभ्यासक्रमांचे, विद्यापीठातील परीक्षांचे मूळ आकृतीबंध बदलविण्यासाठी किंवा अस्तित्वात नसलेले नवे आकृतीबंध ऐनवेळी निर्माण करण्यासाठी विद्यापीठ यंत्रणांवर दबाव टाकण्याचा सातत्याने प्रयत्न करण्यात आला व येत आहे, असा प्रयत्न करणाऱ्या शक्ती व व्यक्ती कोणत्या?

(४) "फूल कॅरिऑन" किंवा "ऐटी केटी" मध्ये जास्तीत जास्त सवलती देण्यासाठी विद्यापीठाच्या यंत्रणावर दबाव टाकून अशा अभ्यासक्रमांच्या परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या सुलभीकरणाचे मार्ग प्रशस्त करण्यासाठी कार्यरत होत्या व आहेत अशा शक्ती कोणत्या व व्यक्ती कोणत्या?

(५) अशा "मौल्यवान अभ्यासक्रमाच्या परीक्षां"चे मूल्यांकन, (Valuation) सारणीकरण (Tabulation) व निकाल तयार करण्याचे काम (preparation of Result) हे विद्यापीठाच्या मुख्यालयात किंवा परिसरात न होता आपल्या खाजगी संस्थांच्या परिसरात व्हावे यासाठी विद्यापीठांच्या यंत्रणांवर दबाव टाकणाऱ्या शक्ती कोणत्या व व्यक्ती कोणत्या? या दबावाला बळी पडून अविधीमय मार्गाने निर्णय घेणाऱ्या विद्यापीठातील व्यक्ती (व अधिकारी) कोणत्या आहेत? विधिमय अधिकारांचा वापर करून प्राधिकरणांनी असे निर्णय घेतले असतील तर अशा प्राधिकरणांचे निर्णय वस्तुस्थितीच्या आधारावर कितपत समर्थनीय आहेत? वा होते? उपरोक्त अभ्यासक्रमाच्या संचालनाला लाभप्रद सहाय्य करण्याच्या बुद्धीने त्यांनी ते निर्णय घेतलेले आहेत काय?

(६) अशा अभ्यासक्रमांना महाराष्ट्रात राज्याबाहेरून दाखल झालेल्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या किती व त्यांच्या पालकांच्या आर्थिक परिस्थितीची सरासरी पातळी काय होती? या त्यांच्या आर्थिक स्थिती बळावर ते ज्या संस्थेत प्रवेशित झाले त्या संस्थेच्या कृतिवर व विद्यापीठाचे अधिकारी कर्मचारी व यंत्रणा यावर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष किती प्रमाणात गैरप्रभाव टाकण्यात ते यशस्वी झाले?

(७) प्रत्यक्ष विद्यापीठामध्ये काम करणारे अधिकारी, कर्मचारी, सेवक, प्राधिकरणांचे सदस्य यांच्यावर धनशक्ती व राजकीय शक्तीच्या माध्यमातून या अभ्यासक्रमाचे लाभदायित्व सुरू रहावे यासाठी प्रभाव टाकण्याचे कितपत प्रयत्न झाले? यापैकी किती यशस्वी झाले?

(८) प्रत्यक्ष विद्यापीठामध्ये काम करणारे अधिकारी, कर्मचारी, सेवक, प्राधिकरणाचे सदस्य यांच्यावर धनशक्ती व राजकीय शक्तीच्या माध्यमातून या अभ्यासक्रमाचे लाभदायीत्व सुरू रहावे यासाठी प्रभाव टाकण्याचे जे प्रयत्न झाले त्याबाबत निदान काही विद्यापीठात या प्रयत्नांना निदान काही प्रमाणात पराभूत करण्यात विद्यापीठांच्या यंत्रणांनी यश मिळविले हे खरे आहे काय? असल्यास ते किती प्रमाणात? व ते कितपत समाधानकारक आहे?

**(सहा)** उपरोक्त आठ मुद्यांच्या बाबतीत उघड न्यायालयीन चौकशीच्या माध्यमातून खरी स्थिती समोर येईल. मा. राज्यपालांनी अशी चौकशी तत्परतेने स्थापीत करावी. अशा न्यायालयीन चौकशी समोर उपरोक्त बाबतीत सर्व विद्यापीठांमध्ये अस्तित्वात असलेली स्थिती कागदोपत्री व पुराव्यानिशी मांडण्याचे कर्तव्य पार पाडण्याची जबाबदारी स्वीकारण्यास संघटना तयार राहील हेही नमूद करण्यात येत आहे. समाजातील अनेक व्यक्ती, संघटना व संस्था याबाबत समोर येतील याची आम्हाला खात्री आहे.

**(सात)** विद्यापीठातील सहाय्यक कुलसचिव या दर्जाचा एक अधिकारी एका १२ तासात सात लाख रुपये नगद स्वरुपात लाच म्हणून देवू शकतो ही वस्तुस्थिती सर्वांनाच भयचकित करणारी आहे. शिक्षण क्षेत्रातील महाराष्ट्राच्या कामगीरींची थोर परंपरा बाजूला सारून अकस्मात एका रात्रीतून संस्थानिकांचा दर्जा पटकाविण्यासाठी राजकीय सत्तास्पर्धकांनी लावलेल्या "बिनाअनुदानाच्या धनदांडग्याचे घर भरणाऱ्या महागड्या शिक्षण व्यवस्थेच्या कडवट वृक्षाला" आलेली विषारी फळे नागपूर विद्यापीठामध्ये डोळ्यात भरेल अशा रितीने समोर आलेली आहेत. या फळांचा बंदोबस्त करित असतांना मुळ विषवृक्षाचा विसर पडू देता कामा नये. ही मुख्यत्वे उच्च शिक्षण व्यवस्थेशी संबंधित असलेल्या सर्वच घटकांची जबाबदारी आहे.

**(आठ)** शिक्षकांचे आणि उच्च शिक्षणाचे पावित्र्य कायम राखण्यासाठी उच्च शिक्षणास काळीमा फासणाऱ्या अशा प्रकाराविरुद्ध तालुका, जिल्हा

---

*सहपत्र ४ :*

***Amravati University Gazette***
*official Publication Of Amravati University*
***PART-TWO***
Saturday, The 18 th September, 1999.
(EXTRA-ORDINARY) (NOTIFICATION)

No. 138/99 Date : 4/9/1999.
Subject : Cessation of membership.
Ref'nce : Notification No. 10/95 dated 17.2.95

It is notified for general information of all concerned that membership of Prof. B.T. Deshmukh, Shri Shivaji Arts and Commerce College, Amravati on the Senate of Amravati University which is by virtue of provision of clause (p) of Sub-section (2), of Section 25 of Maharashtra Universities Act, 1994 now stands ceased w.e.f. 1.9.1999 in accordance with the provision of section 43 of the said Act, as he has been retired on attaining the age of superannuation on 31.1.1999.

By virtue of his membership on the Senate, the membership acquired by him on other authorities/bodies of the University, shall also stands ceased due to cessation of membership on Senate w.e.f. 1.9.99.

Registrar
Amravati University.

AMRAVATI UNIVERSITY GAZETTE- 1999 - PART TWO - 198
*****

आणि केंद्रीय पातळीवर आवश्यकतेनुसार त्या त्या वेळी व त्या त्या ठिकाणी त्वरीत आंदोलनात्मक पाऊल उचलण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात येत आहे."

## विषय क्रमांक २६४
## *सेवा निवृत्तीच्या वयाविषयी*

प्रा. पी.पी.सोवनी ह्यांनी मांडलेला पुढील प्रस्ताव **असम्मत करण्यात आला** :-

"प्राध्यापकांच्या निवृत्तीचे वय ६० वर्षेच ठेवण्यात यावे. त्यात कोणताही बदल करू नये"

## ITEM NO. 265 :
## *ELECTIONS*

**The matter of electing,** (A) President (B) Two Vice Presidents out of which one shall be from the Nagpur University area and one shall be from Amravati University area. (C) Secretary (D) Two Joint Secretaries out of which one shall be from the Nagpur University area and one shall be from Amravati University area. (E) Treasurer (F) Five Executive Committee members, In accordance with the provision of article VI(a) of the constitution of NUTA, for the five year tenure commencing from 1st January 2000 **was then taken up.**

**The President informed the House** that :- "(1) The Notice, dated 1st August 1999, for this purpose was published in the 7th issue of 1999 NUTA Bulletin on page 83. Para 7 of the said notice reads : " Final list of the candidates will be published on the Notice Board of the Office on 17th of August 1999 and also will be published in NUTA Bulletin along with the Agenda of the G.B.Meeting."

(2) accordingly final list of the candidates was published on the notice Board and further notified for the information of all the members of NUTA on page 86 of 1999 NUTA Bulletin."

At this juncture the General Body proceeded to elect the members and the office bearers of the executive committee. The President Prof. B.T.Deshmukh requested the General Body to appoint a Committee for conducting the election and declaring the result.

The **General Body then appointed a committee** consisting of Prof. A.T. Pande as Chairman, and Prof. R.M. Kakani, Prof. N.N. Bhende, Prof. Babasaheb Gulhane, Prof. B.T.Gawande as members.

Dr. E.H. Kathale **Secretary, handed over all the papers concerning election to the Chairman** of the committee, who then chaired the meeting and conducted further business. He announced the final list of the candidates (as circulated on page 86 of 1999 NUTA Bulletin) contesting for different posts.

He further declared that there was only one valid nomination each for the posts of President, Secretary, Joint Secretary (Nagpur University Area), and Treasurer.

Then the Chairman of the Committee **explained the procedure and method of the voting** and the rules and regulations printed on the ballot paper. The committee then conducted the elections. After counting of votes The Chairman of the committee on behalf of the committee declared the results as follows :-

| Post | Names of the Candidates | Votes Secured | RESULT |
|---|---|---|---|
| ***President*** | **Deshmukh, B.T.** | Unopposed | Elected |
| ***Vice-President*** Nagpur Uni. Area | **Kongre, C.D.** | **118** | |
| | **Satputaley, A.S.** | **314** | Elected |
| ***Vice-President*** Amravati Uni. Area | **Pochhi, D.U.** | **390** | Elected |
| | **Tharkar, M.M.** | **40** | |
| ***Secretary*** | **Kathale, E.H.** | Unopposed | Elected |
| ***Joint Secretary*** Nagpur Uni. Area | **Dhage, A.W.** | Unopposed | Elected |
| ***Joint Secretary*** Amravati Uni. Area | **Somvanshi, A.G.** | **402** | Elected |
| | **Tharkar, M.M.** | **30** | |
| ***Treasurer*** | **Tiwari, S.A.** | Unopposed | Elected |
| ***Executive Committee Member (Five)*** | **Bhele, B.M.** | **191** | |
| | **Chintawar, D.B.** | **104** | |
| | **Deshmukh, M.G.** | **176** | |
| | **Gawai, S.S.** | **326** | Elected |
| | **Golait, R.B.** | **255** | Elected |
| | **Kalmegh, S.R.** | **409** | Elected |
| | **Misal, M.D.** | **284** | Elected |
| | **Sangle S.T.** | **382** | Elected |

After declaration of results, the Chairman of the committee requested Prof. B.T. Deshmukh, President to preside over the meeting for transacting the remaining business of the house. Prof. B.T.Deshmukh then presided over the meeting.

The president thanked the chairman and the members of the election committee for conducting the elections and declaring the results. He further introduced all the newly elected members of the executive Committee to the House.

## विषय क्रमांक : २६७
## महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या दिनांक २६.९.१९९९ रोजी होणाऱ्या सभेच्या विचारार्थ प्रस्ताव :

संघटनेच्या अध्यक्षांनी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या रविवार, दिनांक २६.९.१९९९ रोजी होणाऱ्या कार्यकारी मंडळाच्या व जनरल कौन्सिलच्या बैठकीसमोर विचारार्थ पाठविलेला **प्रस्ताव सभागृहासमोर प्रसृत करण्यात आला.** (१९९९ च्या ई-एक्स फाईलचे पृष्ठ क्रमांक ९४) **त्याची सभागृहाने नोंद घेतली.**

या संदर्भात महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या स्तरावर जो अंतिम निर्णय होईल **त्याप्रमाणे कारवाई करावी असे ठरले.**

## विषय क्रमांक : २६८
## सभा व्यवस्थेबद्दल आभार :

सचिव प्रा.एकनाथ कठाळे यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य व स्थानिक शाखेच्या इतर प्राध्यापकांनी, जिल्हा नुटाचे अध्यक्ष, सचिव व सदस्य यांनी, ही सभा यशस्वी करण्यासाठी घेतलेल्या परिश्रमाबद्दल आणि दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे मनःपुर्वक आभार मानले. शेवटी सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानून सभा संपली असे अध्यक्षांनी जाहीर केले.

स्वा / **बी.टी.देशमुख**
***अध्यक्ष***

स्वा / **एकनाथ कठाळे**
***सचिव***

*******

---

**No.CIM/7 : : Dated 1st October 1999**

**CORRECTION**

in **the copy of the Minutes of the General Body Meeting of NUTA**

Copy of the Minutes of the General Body Meeting of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION held at 12.00 noon on SUNDAY, the 19th September,1999 atShri. Shivaji Arts & Commerce College, Amravati. is circulated in this NUTA Bulletin. If you propose to suggest any Correction to the Minutes, it may be pointed out to the Secretary (Prof.E.H.Kathale, Secretary, NUTA, N-162 Reshim Bagh, Nagpur-440 009.) by letter within 10 days from the date of posting of this Bulletin.

It will not be possible for the Corrections received after the due date to be included in the List of Corrections for consideration.

Please send one copy of your amendment to Prof. B.T.Deshmukh, President NUTA, 3 Subodh Colony, Near Vidarbha Mahavidyalaya, Amravati-444 604. - *Secretary NUTA*

**********

# DISTRICT UNITS OF NUTA : ELECTION NOTICE

From.
**Dr. E.H.Kathale,** **Nagpur**
Secretary, NUTA. 30th Sept. 1999

To,
All the members of NUTA.

**Subject :** Meeting Notice for the Elections of District Units.

Dear Members,

I have the honour to convene the meetings of the different District-Units to transact the following business on the day, date, time and place mentioned in the Table below.

## AGENDA

### ITEM NO. 1
### *ELECTION OF DISTRICT UNIT OFFICE BEARERS.*

To elect the following office bearers of the District Unit of NUTA from amongst the members of the concerned District as per para 6 of the District Unit Bye-laws. :- (Circulated on page 116 of 1999 NUTA Bulletin)

i) One President,
ii) One Vice President,
iii) One Secretary,
iv) One Joint Secretary and
v) Three members

### ITEM NO. 2 :
### *ORGANISATIONAL MATTERS*

**Call of Indeifinate strike** given by MFUCTO begining from 8th December 1999.

All members whose names have been included in the NUTA life Members Register on the date of the posting of this Bulletin shall be eligible to attend and participate in the proceedings of the meeting. I therefore request all the members of the respective districts to kindly make it convenient to attend the meetings.

Yours faithfully,
s/d **E.H.Kathale**
Secretary, NUTA

## TABLE

**Giving Detatils of the Programme of District - Units Election Meetings**

| अ.नं. व जिल्ह्याचे नांव | बैठकीचा दिवस व दिनांक | बैठकीची वेळ | बैठकीचे ठिकाण | निवडणूक संचालनार्थ निरिक्षक |
|---|---|---|---|---|
| १ २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. वाशिम | शुक्रवार, २२.१०.१९९९ | सकाळी ९.०० वा. | राजस्थान आर्यन कॉलेज, वाशिम | प्रा.एम.एन. अंधारे<br>प्रा. ए.बी.गावंडे |
| २. अकोला | शुक्रवार, २२.१०.१९९९ | दुपारी १.०० वा. | श्री.शिवाजी महाविद्यालय, अकोला. | प्रा.अनिल ढगे<br>प्रा.एस.बी.चिंचमलातपूरे |
| ३. बुलढाणा | शुक्रवार, २२.१०.१९९९ | दुपारी ५.०० वा. | श्री. शिवाजी महाविद्यालय, चिखली | प्रा.अ.शं.सातपूतळे<br>प्रा.ए.जी.सोमवंशी |
| ४. यवतमाळ | शनिवार, २३.१०.१९९९ | सकाळी १०.०० वा. | लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ | प्रा.सी.डी.कोंगरे<br>प्रा.एस.ए.तिवारी |
| ५. अमरावती | शनिवार, २३.१०.१९९९ | दुपारी ३.०० वा. | भारतीय महाविद्यालय, अमरावती | प्रा.एस.टी.सांगळे<br>प्रा.अ.शं.सातपूतळे |
| ६. वर्धा | शनिवार, ३०.१०.१९९९ | सकाळी ९.०० वा. | य़शवंत महाविद्यालय, वर्धा. | प्रा. ए.बी.गावंडे<br>प्रा.अनिल ढगे |
| ७. नागपूर शहर | शनिवार, ३०.१०.१९९९ | दुपारी १.०० वा. | जी.एस.कॉलेज ऑफ कॉमर्स नागपूर | प्रा. ए.बी.गावंडे<br>प्रा.एम.एन. अंधारे |
| ८. नागपूर ग्रामिण | शनिवार, ३०.१०.१९९९ | दुपारी ४.०० वा. | नबिरा महाविद्यालय, काटोल | प्रा. ए.बी.गावंडे<br>प्रा.एम.एस.पडोळे |
| ९. भंडारा | रविवार, ३१.१०.१९९९ | सकाळी ९.०० वा. | मनोहरभाई पटेल महाविद्यालय, भंडारा | प्रा.सी.डी.कोंगरे<br>प्रा.एस.ए.तिवारी |
| १०. गोंदिया | रविवार, ३१.१०.१९९९ | दुपारी ३.०० वा. | एन.एम.डी.कॉलेज, गोंदीया | प्रा.ए.जी.सोमवंशी<br>प्रा.अनिल ढगे |
| ११. चंद्रपूर | सोमवार, ०१.११.१९९९ | सकाळी १०.०० वा. | एस.पी. कॉलेज, चंद्रपूर | प्रा.सी.डी.कोंगरे<br>प्रा.एस.ए.तिवारी |
| १२. गडचिरोली | सोमवार, ०१.११.१९९९ | दुपारी ४.०० वा. | शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली | प्रा.ए.जी.सोमवंशी<br>प्रा.अ.शं.सातपूतळे |

*भारतीय घटनेतील धर्मस्वातंत्र्य हे महत्त्वाचे मूल्य होऊ शकेल. परंतु "Freedom of Worship" आणि "Freedom of Propogation" या दोन्ही स्वातंत्र्याकडे एकाच दृष्टीने पाहाणे अयोग्य ठरेल. धार्मिक पूजेचा संबंध प्रत्येक नागरिकांशी येतो. परंतु धर्म प्रचाराचा वा प्रसाराचा सबंध फक्त धर्मगुरुंशी येतो. भारतीय घटनेत बदल करून जर "Freedom of propogation" हे शब्द घटनेतून वगळले तर भारतीय निधर्मी लोकशाही अधिक मजबूत व कार्यशील होईल - डॉ.एल.बी.केणी*

## महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे प्रथम अध्यक्ष डॉ.एल.बी.केणी यांचे दुःखद निधन

### *(उत्तरार्ध)*

### प्रा.बी.टी.देशमुख, अध्यक्ष नुटा

**१६.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या जळगाव येथे १ जून १९९० रोजी झालेल्या बैठकीमध्ये महासंघाचा अध्यक्ष या नात्याने माझी एकमताने निवड झाली. डॉ.केणी हे व्यवसायातून व संघटनेच्या कामातून निवृत्त होऊन काही वर्षे झालेली होती. अध्यक्ष म्हणून निवड झाल्यावर आपण त्यांची भेट घ्यावी अशी इच्छा माझ्या मनामध्ये निर्माण झाली. मुंबई येथील संघटनेचे जेष्ठ नेते प्रा.इ.एन. मांजरेकर यांच्याकडे मी याबाबत चौकशी केली. या चौकशीच्या वेळी "निवृत्ती वेतनाचा विकल्प न दिल्यामुळे डॉ.केणी यांना सेवानिवृत्ती वेतन मिळत नाही" असे मला कळले. प्रत्यक्ष भेट झाली नसली तरी **गेल्या २-४ वर्षात फोनवरून माझ्याशी अनेकदा झालेल्या बोलण्यामध्ये डॉ.केणी यांनी हा विषय कधी काढला नव्हता.** "ही माहिती बिनचुक आहे काय?" असे मी मांजरेकरांना विचारले तर त्यावर "ही माहिती बिनचूकच आहे पण तुम्ही म्हणाल तर आणखी चौकशी करुन कळवितो" असे मांजरेकरांनी सांगितले.

**१७.** विकल्प देण्याची संधी पुन्हा दिली जावी अशी मागणी शिक्षकेतर कर्मचारी संघटनेकडून तिव्रतेने केली जात होती. शिवाय त्याच काळात स्वेच्छानिवृत्तीची व्यवस्था लागू करणारा शासननिर्णय ७ मार्च १९९० ला निर्गमित झाला होता. सभागृहामध्ये **"विकल्पाची संधी नव्याने देण्याबाबत १५ दिवसात निर्णय घेण्यात येईल"** असे आश्वासन मा. शिक्षण राज्यमंत्र्यांनी ७ एप्रिल १९९० रोजी पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये दिले होते. डॉ.केणी यांचेबाबत जी उपरोक्त माहिती कळली, त्यामुळे या प्रश्नाचा तिव्रतेने पाठपुरावा करावा असे मी ठरविले.

**१८.** दिनांक १४ जुलै १९९० रोजी मी स्वतः मा. उच्च शिक्षणमंत्र्यांना एक पत्र लिहून "विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयातून काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती व्यवस्था स्विकारण्यासाठी विकल्प देण्याची कालमर्यादा वाढवून देण्यात यावी" अशी विनंती केली. मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी दिनांक २०.९.१९९० रोजी माझ्या पत्राला उत्तर पाठविले, त्यामध्ये त्यांनी "सबब महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांना स्वेच्छा निवृत्तीसाठी विकल्प बदलण्याची संधी देण्याबाबत आपण संदर्भाधीन पत्रान्वये केलेली **विनंती मान्य करता येत नाही** याबाबत शासन दिलगीर आहे." असे नमुद केले होते.

**१९.** दिनांक ७ ऑगस्ट १९९१ रोजी लक्षवेधी सुचनेच्या माध्यमातून सभागृहामध्ये मी हा प्रश्न पुन्हा उपस्थित केला. निवेदनात मा. शिक्षणमंत्र्यांनी नकारार्थी निर्णय नमुद केला होता. बरीच चर्चा झाली पण ते आपली भूमिका बदलायला तयार नव्हते. ३० मार्च १९९३ ला लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून पुन्हा हा प्रश्न चर्चेला आला. मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी अनुकुल भूमिका घेतली नव्हती. उच्च शिक्षणमंत्री नविन होते व यावेळी झालेल्या चर्चेत त्यांच्या तोंडून अनेक चुकीची व असत्य विधाने सभागृहात माहीती अभावी केली गेली. त्यातून १२ एप्रिल १९९३ ला मी हक्कभंगाची सूचना दिली. त्याचदिवशी मा. सभापतींनी **"याबाबत मी मा. उच्चशिक्षण मंत्र्यांकडून खुलासा मागवित आहे. खुलासा आल्यानंतर सूचनेवर निर्णय देण्यात येईल"** असा निर्णय दिला. याचा योग्य तो परिणाम झाला. **मंत्र्यांनी खुलासा तर पाठविलाच पण विकल्प देण्याचा निर्णय घेतला व शासननिर्णय निर्गमित करुन तो खुलाशासोबत जोडून पाठविला.**

**२०.** माझ्या हक्कभंगाच्या सुचनेवर मा. सभापतींनी २८ एप्रिल १९९३ रोजी सभागृहात निर्णय दिला. त्या निर्णयामध्ये त्यांनी असे नमुद केले होते की **"माननीय उच्च शिक्षण मंत्र्यांनी आपल्या या खुलाशात म्हटल्याप्रमाणे दिनांक २६ एप्रिल १९९३ रोजी संबंधित आदेश निर्गमित केला असून त्याची प्रत देखील सादर केली आहे."**

२१. वर नमुद केलेला पत्रव्यवहार, शासननिर्णय व सभागृहातील चर्चा याबाबतचा सर्व मजकुर मी दिनांक १५ जुलै १९९३ व १ ऑक्टोबर १९९३ ला प्रसिद्ध झालेल्या 'नुटा बुलेटीन'च्या अंकात (१९९३ चा अंक ३ व ५) शब्दशः प्रसिद्ध केला होता. खुद्द अमरावती शहरामधील माझ्या काही दिवंगत जेष्ठ सहकाऱ्यांचे कुटूंबीय विकल्प देण्याची मुदत निघून गेल्यामुळे कुटूंब निवृत्ती वेतनापासून वंचित आहेत याची मला माहिती होती. इतर अनेक ठिकाणी अशी स्थिती होती. म्हणून १५ जुलै १९९३ च्या नुटा बुलेटीनच्या अंकात पृष्ठ २६ वर पुढील **"महत्वाची विनंती"** प्रसिद्ध करण्यात आली होती :-

**"महत्वाची विनंती :** जिल्हा युनीट व स्थानिक युनीटच्या बैठकी घ्याव्यात. या पृष्ठावरील शासन निर्णयाचे वाचन करावे. यापुर्वी विकल्प न दिलेले सेवेतील सहकारी, तसेच १९७३ पूर्वी किंवा त्यानंतर निवृत्त झालेले आपले सहकारी किंवा अशा दिवंगत सहकाऱ्यांचे कुटूंबीय याची आठवण करुन त्यांच्या ही बाब लक्षात आणून द्यावी. विकल्पाची मुदत पुन्हा वाढवून मिळेल असे वाटत नाही. पुढे ही अत्यंत कटकटीची गोष्ट होते. मुदतीच्या आंत विकल्प नोंदवून त्याची पोच घ्यावी."

**२१.** १५ जुलै व १ ऑक्टोबर १९९३ चे "नुटा बुलेटीन"चे दोन अंक व सोबत "विकल्पपत्राच्या दोन प्रति" डॉ.केणी यांना मी रजिस्टर्ड पोस्टाने पाठविल्या व त्यांनी ठरलेल्या मुदतीमध्ये विकल्पपत्रे भरून सेवानिवृत्तीच्या महाविद्यालयामध्ये पाठवावीत अशी त्यांना विनंती केली होती. माझ्या या रजिस्टर्ड पोस्टाने पाठविलेल्या पत्राला डॉ. केणी यांनी रजिस्टर्ड पोस्टानेच १७ नोव्हेंबर १९९३ ला उत्तर पाठविले. मी विधानपरिषदेमध्ये व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघामध्ये सक्रियपणे काम करीत आहे याची माहिती असूनही साधी फोनवरसुद्धा त्यांनी ही गोष्ट माझ्या कानावर कधी घातली नव्हती. पण मी केलेल्या या कामाबद्दल त्यांनी माझे मनापासून अभिनंदन केले ते पुढील शब्दात :-

"Thank you very much for your NUTA Bulletins of 15th July and 1st October 1993, together with the copy of the option form in duplicate to be sent to the Principal of the college of retirement, before 31st October 1993. I must, at the outset, offer my "hearty congratulations" in the grand success of yours in the political academic battle with the government. **I feel not only very very happy but also proud of you as a representative of University and college Teachers,** fighting for their justice and

### महिला प्राध्यापकांच्या सेवेतील खंड क्षमापित करणेबाबत.

*महाराष्ट्र विधानपरिषद : : पहिले अधिवेशन, १९९८*

***शुक्रवार, दिनांक २४ एप्रिल १९९८***

*रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या*

*अतांराकित प्रश्नोत्तरांच्या पहील्या यादीतील प्रश्न क्रमांक (२१) २२४४०*

**(२१) २२४४०. सर्वश्री जयवंत ठाकरे, बी.टी.देशमुख, पी.जी.दस्तुरकर,सुरेश पाटील, व्ही.यू.डायगव्हाणे,शरद वाणी :** सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय:-

(१) लग्न किंवा पतीची बदली, प्रसुती व बाल संगोपन, मुलांचे व कुंटुबातील व्यक्तींचे आजार यांसारख्या कारणांमुळे महिला प्राध्यापकांच्या सेवेत पडणारे खंड, पदोन्नती व निवृत्तीवेतन व त्या अनुषंगाने मिळणाऱ्या फायद्यामध्ये अडथळा ठरता कामा नये अशी मागणी करणारे एक निवेदन मुंबई विद्यापीठ प्राध्यापक संघटनेच्या (बुक्टु) महिला विभागाच्या सहनियंत्रकांनी सचिव, उच्च शिक्षण विभाग यांना दिनांक १७ फेब्रुवारी १९९७ रोजी किंवा त्या दरम्यान सादर केले, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, या मागणीबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे;

(३) अद्याप निर्णय झालेला नसल्यास, होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री.दत्ता राणे (१३-१-९८) :** (१) होय.

(२) व (३) महिला प्राध्यापकांच्या मागण्याबाबतचा प्रस्ताव महिला बालकल्याण विभाग व वित्त विभागाच्या सल्ल्याने तपासण्यात येत आहे.

**Unless archaeology, an auxiliary science of history, is used scientifically, along with literary sources, the excavations of Dvaraka would continue to be pseudo-scientific as they appear to be today. History is interpretation based on human reasoning, not on emotion. - Dr.L.B.Kenny**

welfare, and against any injustice against them."

२२. नुटा बुलेटीनच्या उत्तम कामगीरीबद्दल याच पत्रात त्यांनी "Your NUTA Bulletins have been so very useful to enlighten me about the whole issue of the government apathy for higher education." असे नमुद केले होते. पत्राच्या शेवटी न चुकता त्यांनी माझे आभार मानले व अभिनंदनही पुन्हा केले होते ते पुढील शब्दात "Congratulating you once again for your valuable service to the teaching fraternity and your praiseworthy achievement in the cause of education, and **thanking you once again for all the valuable help and guidance you have given me regarding the new GR,** and wishing you and your family members a Happy and prosperous Deepavali,"

२३. व्यक्तीशः माझ्या, नुटा बुलेटीनच्या व संघटनेच्या कामाविषयी त्यांचे विचार नमुद असलेल्या १७ नोव्हेंबर १९९३ च्या या पत्रातच त्यांनी "I am enclosing **two of my recently published articles for your perusal.** " असेही नमुद केले होते व सोबत नुकतेच प्रकाशित करण्यात आलेले त्यांचे दोन लेख माझ्या उपयोगासाठी पाठविले होते. डॉ.एल.बी.केणी यांच्यासारख्या जेष्ठ सहकाऱ्याचे ते पत्र व ते दोन लेख अत्यंत काळजीपूर्वक मी माझ्या संग्रही ठेवले होते. "**अंधश्रद्धा हानिकारक आहे**" हा त्यांचा लेख त्यांच्या जिवनभराच्या तार्किक विचारांचे प्रतिनिधीत्व करणारा असून "*Archaeology and Krsna's Dvaraka*" या लेखामध्ये त्यांच्या विद्याव्यासंगाचे प्रतिबिंब आपल्याला दिसेल. परवा १९ सप्टेंबर १९९९ रोजी झालेल्या नुटाच्या आमसभेमध्ये श्रद्धांजलीपर ठरावावरील भाषणामध्ये मी त्यांच्या पत्राचा व लेखांचा व त्यातील मजकुराचा उल्लेख केला. सभेनंतर अनेकांनी माझ्याजवळ ती कागदपत्रे मुळातून वाचण्याची इच्छा व्यक्त केली. काहींनी सभेच्या गडबडीत सुद्धा छायाप्रति काढून घेतल्या. डॉक्टरसाहेबांची आठवण म्हणून जपून ठेवलेले ते पत्र व त्यांचे ते दोन लेख मी आजच्या अंकामध्ये प्रकाशित करित आहे. – **बी.टी.देशमुख**

***दुरुस्ती :*** *यापूर्वीच्या अंकामध्ये पृष्ठ १०१ ते १०३ वर या लेखाचा पूर्वार्ध यापूर्वीच प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्यातील पृष्ठ १०३ वरील परिच्छेद १६ तेथून रद्द करून आजच्या भागात शेवटी परिच्छेद २४ म्हणून जोडावा ही विनंती -- बी.टी.देशमुख*

***Notes :*** *(1) The district- Unit bye-laws, were approved by the General Body, vide item No. 2, in its meeting held on 29th November 1976. (2) These bye-laws were further amended by the proposal, printed on page 40 of 1980 Nuta Bulletin, approved by the General Body vide item No. 29 in its meeting held on 12th October 1980. (3) These bye-laws were originally printed on page 70 of 1976 Nuta Bulletin. (4) and were reproduced on page 4 and 5 of 1978 Nuta Bulletin. (5) further were again printed on page 51 of 1993 Nuta Bulletin and on page 95 of 1999 Bulletin. (6) These bye-laws were further amended by the proposal, printed on page 85 of 1999 Nuta Bulletin, approved by the General Body vide item No. 260 in its meeting held on 19th September 1999 and now are printed as amended uptodate.*

# DISTRICT UNITS OF NUTA; BYE-LAWS - 1976

**PROVIDING FOR THE ESTABLISHMENT OF DISTRICT UNITS OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION .**

*(As required under para 'd' of Article IV of the constitution.)*

WHEREAS it is expediant to frame bye-laws providing for the establishment and functioning of the district units of the association and;

WHEREAS it is also necessary to determine the relationship of such units with other organs of the association;

NOW THEREFORE as required under the provisions of para 'd' of Article IV of the constitution, the following bye-laws are framed;

1) These Bye-laws may be called District Units Bye-Laws, of NUTA,1976.

2) These bye-laws shall come into force after their acceptance by the General Body of the Association and on such date[1] as may be prescribed by the Executive Committee for this purpose.

3) The Association may have the following district units :-

1. Akola District.
2. Amravati District.
3. Bhandara District.
4. Buldhana District.
5. Chandrapur District.
6. Nagpur District ( excluding city of Nagpur)
7. Nagpur City.
8. Wardha District.
9. Yavatmal District.
10. Gadchiroli
11. Washim
12. Gondia

4) District unit may be established in such a district where the total membership of the Association is 200 or half the number of the teachers (in that district) whichever is less.

5) For the purpose of para 4, total number of teachers in a given district shall be as is published in the latest Annual Report of the Nagpur and Amravati University as the case may be

